# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७५/माहिती कक्ष/वार्तपत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांक २८/०५/२०१८

**१) खुंटीला अटकवलेल्या शर्टचे खिश्यातुन नगदी पैसे व मोबाईलची चोरी :—**

दिनांक २३/०५/२०१८ चे १९.०० वाजता ते २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी कु. पौर्णिमा दशरथ खराबे वय ४० वर्ष, रा. जी. टाईप ५/४ जवाहरनगर ही आपले भावाचे लग्नाचे रिशेप्शनचे कार्यक्रम करीता बहुउद्देशीय भवन जवाहरनगर येथे गेली असता भावाला टिका लावुन जे पैसे देत होते त्या पैश्याची बॅग व त्यामधील एक नोकीया कंपनीचा मोबाईल ठेवलेला होता नंतर घरी परत आल्यावर घरी खुंटीला अटकवलेल्या भावाचे शर्टचे खिशात ठेवलेले नोकीया कंपनीचा मोबाईल व नगदी १४,५००/—रु. असा एकुण १७,५००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने खुल्या दारातुन आत प्रवेश करुन खुंटीला अटकवलेल्या शर्टचे खिशातुन चोरुन नेल्याने पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी :—**

दिनांक २७/०५/२०१८ चे १६.१० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुभ्रमन्यम रामास्वामी कोनार वय ५७ वर्ष, रा. सनफ्लॅग कॉलोनी वरठी यानी आपली हिरो कंपनीची स्पलेडंर प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन कॅफे समोर ऊभी करुन सामान खरेदी करुन लस्सी पिऊन कॅफेतुन बाहेर आले असता त्यानी ठेवलेल्या ठिकाणी मोटार सायकल न दिसल्याने कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. कारंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे व्हॅगनर गाडीला धडक मारुन गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २६/०५/२०१८ चे २२.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी भास्कर बाळकृष्ण चेटुले वय ५१ वर्ष, रा. मानेगाव सडक ह.मु. अंबिका नगर नागपुर हा त्याचे मारोती व्हॅगनर गाडी क्र. एम एच ३१ पी के ३९८८ ने स्वयंपाकी लोंकाना सावरी मुरमाडी येथे सोडुन मुळगाव मानेगाव सडक येथे येत असतांनी घटना ठिकाणी रोडचे कडेला गाडी ऊभी करुन गाडीतुन उतरुन बाजुला उभा असतांनी यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपणामुळे चालवुन फिर्यादीचे व्हॅगनर गाडीला बसस्टॉप चौक लाखनी एन एच ०६ रोड येथे धडक मारुन अंदाजे १,००,०००/—रु. ची नुकसान करुन पळुन गेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमने पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरुन विटाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २६/०५/२०१८ चे २२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अमर राजु बोरकर वय १९ वर्ष, रा. गांधी वार्ड भंडारा याने आरोपीचे गाडीला ओव्हरटेक केल्याचे कारणावरुन किरकोळ भांडण करुन यातील आरोपीने फिर्यादीचे डोक्याचे डाव्या बाजुला विटाने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) महिला मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :–

दिनांक २६/०५/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गुलाब झबरु शेन्डे वय ४७ वर्ष, रा. नरसिंह टोला याची मृतक पत्नी सौ. अनिता गुलाब शेन्डे वय ३५ वर्ष, रा. नरसिंह टोला हिचे सोबत घरी आल्या नंतर मृतक पत्नी ही आपले घरी झोपली असता फिर्यादीने तिला जेवनासाठी उठविले परंतु ती उठली नाही ती मरण पावल्याची आढळुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

६) अवैध हातभट्टी,देशी दारु अडड्यांवर धाडी . :–

दिनांक २७/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन साकोली, लाखनी व पवनी येथे हातभट्टी, देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी किंमती १०००/–रु. व ५० लिटर ४० मिली लिटर देशी / विदेशी दारु किंमती १६,२२३/–रु. असा एकुण किंमती १७,२२३/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २७/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– ०४ ईतर वाहनांवरती – २२ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.